# जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय

**तळ मजला (खनिकर्म शाखा), जयस्तंभ, रत्नागिरी ४१५६१२**

**फोन नं.०२३५२-२२३६०२ फॅक्स नं.०२३५२-२२६२५०**


क्र.खनिकर्म-२/ड्रेझर-रेतीगट/प्रथम फेर लिलाव/१८-१९
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
दिनांक :- ३०/०३/२०१९

प्रति,

सहाय्यक संचालक,
माहिती व जन संपर्क महासंचालनालय,
नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**विषय :-** ई-निविदा व ई-लिलावप्रक्रिये द्वारे करावयाच्या रेती/वाळू निर्गतीच्या सुचनेची जाहिरात वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्याबाबत...

रत्नागिरी जिल्हयांतील वाशिष्ठी नदी/दाभोळखाडी मधील ड्रेझरद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटाचा ई-निविदेसह द्वितीय फेरलिलाव प्रक्रियेद्वारे करण्याच्या सूचना, जाहीरात या पत्रा सोबत जोडलेली आहे. सदर जाहीरात वृत्तप्रत्रातून प्रसिध्द करणात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जाहिरात देणा-या अधिका-याचे पदनाम पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | जिल्हाधिकारी रत्नागिरी<br>दूरध्वनी :-०२३५२-२२५८४४ |
| २. | कोणत्या तारखेस जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. | : | **दिनांक ०२/०४/२०१९** |
| ३. | प्रसिध्दीचे स्वरुप | : | राज्य स्तरावरुन प्रसिध्द होणा-या प्रमुख वर्तमानपत्रांत. |
| ४. | प्रसिध्दी किती वृत्तपत्रात व किती वेळा | : | दोन मराठी वृत्तपत्रात एक वेळा. |
| ५. | जाहीरातीचे देयक कोणाच्या नावे करावयाचे | : | जिल्हाधिकारी रत्नागिरी<br>खनिकर्म शाखा. |

सोबत सूचनेच्या चार प्रती.

सही/- XXX
(सुनील चव्हाण)
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

..२..

प्रत:-

१. मा. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

२. मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

३. उपविभागीय अधिकारी सर्व/तहसीलदार सर्व

२/- रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी नदी/दाभोळ खाडी व शास्त्री नदी/जयगड खाडी मधील ड्रेझरद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटांची लिलावाद्वारे विक्रीची जाहीरात सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. गौखनि १०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दिनांक २१/०५/२०१५ मधील परिच्छेद क्र. B-4 (3) मधील सूचना नुसार या जाहिरातीच्या प्रती सर्व क्षेत्रीय महसूल अधिका-यांच्या कार्यालयात सूचना फलकावर प्रसिध्द कराव्यात. त्याचप्रमाणे प्रस्तुत जाहिरात आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(बाबासाहेब बेलदार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी.

**जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी**
खनिकर्म शाखा, जुनी इमारत, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दूरध्वनी क्र.-02352-225844 फॅक्स क्र.-02352/226250,
ईमेल-dmocortn@yahoo.com

---

**ई-निविदेसह ई-लिलाव सूचना**

**सन 2018-19 करिता दिनांक 30 सप्टेंबर, 2019 पर्यंतच्या मुदतीसाठी रेती/वाळू द्वितीय फेर लिलाव.**

**यांत्रिक साधनाव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक 30 सप्टेंबर, 2019 पर्यंतच्या मूदतीसाठी ई-निविदासह द्वितीय फेरलिलाव (सन 2018-19)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 21 मे, 2015 रोजी अन्वये निश्चित केलेले धोरण.**

रत्नागिरी जिल्हयातील वाशिष्ठी नदी/दाभोळखाडी पात्रातील यांत्रिक साधनांव्दारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या 1 रेती गटांच्या (1 रेती उपगटाचा) निर्गतीसाठी ई-निविदेसह द्वितीय फेरलिलाव प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक 21 मे, 2015, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील सी.आर.झेड. विषयक अनुमती, शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार पत्र जा.क्र.ममोबो/मुकाअ/जआ/टी-99xl/यां. उत्खनन-रत्नागिरी/2018-19/968 दिनांक 04/10/2018 व सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

1. ई-निविदेसह ई-लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व व त्यांचे तांत्रिक सहयोगी ABC Procure, अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

2. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://ratnagirico.abcprocure.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

3. या लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 1 | 02-04-2019 | सकाळी 10.00 पासून | प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींचे/संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ई-निविदा भरणे सुरु होईल. |
| 2 | 12-04-2019 | सायं.5.00 | ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल. |
| 3 | 15-04-2019 | सायं.5.00 | ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणे बंद होईल. |
| 4 | 18-04-2019 | सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यत. | ई-लिलाव प्रक्रिया...... सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यत. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनीटे प्रमाणे 3 (तिन) वेळा वाढ करण्यात येईल. |
| 5 | 18-04-2019 | -- | उक्त लिलावाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ई- निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल व ई- निविदा/ई-लिलाव यातील उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल. |

4. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी मागील 3 वर्षांची आयकर विवरणपत्रे, पॅन कार्ड, टॅन कार्ड (कंपनी असल्यास) व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

5. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

6. ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढीलप्रमाणे ना परतावा फी ऑनलाईन पध्दतीने अदा कराव्या लागतील.

   i. नोंदणी फी फक्त एकदाच रु. 2950/-

   ii. फॉर्म फी प्रत्येक वाळू स्थळाकरीता स्वतंत्र रु. 2000/- (10 लाखांपर्यंत अपसेट प्राईस असलेल्या वाळू स्थळांसाठी) व रु. 5000/- (10 लाखांपेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता)

   iii. प्रक्रिया फी (प्रत्येक वाळू उपगटाकरीता स्वतंत्र) रु. 1593/-

7. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी प्रपत्र "अ" च्या रकाना 11 मध्ये नमूद केलेली रक्कम अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

8. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम आरटीजीएस/एनईएफटी द्वारे देय रक्कम बिडर आयडीमध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर भरणा करणे आवश्यक आहे.

9. ई-निविदा व ई-लिलावाच्या प्रक्रियेबाबत https://ratnagirico.abcprocure.com या संकेतस्थळावर सादरीकरण (प्रात्यक्षिक) पाहता येईल.

10. ई-निविदा व ई-लिलावाबाबत कोणत्याही अडचणी असल्यास 07968136878/45/50/49/19/62/48/72 या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

क्र.खनिकर्म/2/ द्वितीय फेरलिलाव/ड्रेझर-रेतीगट/18-19<br>
स्थळ : - जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी<br>
दिनांक:- 30/03/2019

सही/- xxx<br>
(सुनील चव्हाण)<br>
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

<u>प्रपत्र-अ</u>

1. (i) गट "CC" वाशिष्ठी नदी/दाभोळ खाडीच्या मुखापासून 32.5 कि.मी. अंतरावर खाडीमध्ये सुरु होत असून सदर गटाची एकूण लांबी 5.5 कि. मी. एवढी आहे. गट "CC" हा यांत्रिक/ड्रेजरद्वारे उत्खननास राखीव ठेवण्यात आलेला आहे.

(ii) नकाशा क्रमांक 1325 गांग्रई ते करंबवणे गट "CC" मधील उत्खननाचे परिमाण खालीलप्रमाणे उपगटाद्वारे देण्यात येत आहे.

(iii) गट "CC" मधील उत्खननाची एकूण लांबी 0.5 कि.मी.

| अ. क्र. | नकाशा क्रमांक व गटाचे नाव | उपगटाचे नाव | अक्षांश | रेखांश | नौकानयन जलमार्गातील गटांची लांबी व रुंदी व सरासरी उपलब्ध खोली व निर्माण/निश्चित करावयाची खोली (मीटरमध्ये) | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडील सर्वेक्षणानुसार उपलब्ध साठा (परिमाण ब्रासमध्ये) | MCZMA मान्यता प्राप्त उपलब्ध कालावधीकरीता उत्खननासाठी अनुज्ञेय साठा (ब्रासमध्ये) | ड्रेझरची संख्या | हातची किंमत रक्कम रुपयामध्ये | ई-निविदा/ ई-लिलावाबाबत भरावयाची अनामत रक्कम (र.क्र. 9 च्या 20% प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | नकाशा क्रमांक 1325 | CC1-a | 1)17⁰34'36"N<br>2)17⁰34'32"N<br>3)17⁰34'40"N<br>4)17⁰34'43"N | 1)73⁰23'00"E<br>2)73⁰23'00"E<br>3)73⁰23'16"E<br>4)73⁰23'14"E | 500 x 100 x 4.00 निर्माण/निश्चित करावयाची खोली 5 | 29,798 | 17632 | 1 ड्रेझर | 3,71,32,992 | 74,26,598 |

क्र.खनिकर्म/2/द्वितीय फेरलिलाव/ड्रेझर-रेतीगट/18-19
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक :- 30/03/2019

सही/- xxx
(सुनील चव्हाण)
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

# जिल्हाधिकारी कार्यालय,
# रत्नागिरी

**खनिकर्म शाखा, तळ मजला,**

**जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी**

क्र.खनिकर्म-2/द्‌वितीय फेरलिलाव/ड्रेझर-रेतीगट/18-19

## सन 2018-19 करीता रत्नागिरी जिल्हयातील वाशिष्ठी नदी/दाभोळ खाडीपात्रामधील यांत्रिक पद्धतीने रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटांच्या ई-निविदा/ई-लिलावाची प्रक्रिया, अटी व शर्ती

## (ई-लिलाव)

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव उपगटांकरीता दिनांक 30 *सप्टेंबर* 2019 पर्यंतच्या मूदतीसाठी ई निविदा सह द्वितीय फेरलिलाव (सन 2018-19) सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 21 मे, 2015 रोजी अन्वये निश्चित केलेले धोरण.**

---

## सर्वसाधारण माहिती

सदरची निविदा प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक 21 मे, 2015, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडील सी.आर.झेड विषयक अनुमती व शासन, पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती/सर्वेक्षण अहवाला मधील अटी/शर्तीस अधीन राहून करण्यात येत आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या वाशिष्ठीनदी/दाभोळखाडीमधील यांत्रिक साधनाद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटांच्या निर्गतीसाठी ई निविदासह ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून सदर प्रक्रियेसाठी आय.सी.आय. सी.आय. बँक व ए.बी.सी. प्रोक्युअर, अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या वाशिष्ठीनदी/दाभोळखाडीमधून यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या 2 रेतीगटांच्या (3 रेती उपगटांच्या) निर्गतीसाठी सन 2018-19 करिता दिनांक 30/09/2019 पर्यंतच्यामुदतीसाठी ई-निवीदासह ई-लिलाव प्रक्रियेची सविस्तर माहिती https://ratnagirico.abcprocure.comया वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आली आहे.

इच्छूक व्यक्तींना / संस्थांना या प्रक्रियेमध्ये भाग घेणेसाठी आवाहनकरण्यात येत आहे. या प्रक्रियेची सविस्तर माहिती घेणेकामी ए.बी.सी प्रोक्युअर चे प्रतिनीधी यांचेशी खालील दूरध्वनी क्रमांकावर अथवा ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

संपर्क तपशील :- नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजूरीसाठी, कृपया खालील क्रमांक वर संपर्क साधा.

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव | संपर्क क्रमांक | मोबाईल नंबर | ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| 1 | सोनू टँक | 079 68136878 | | sonu@abcprocure.com |
| 2 | सताब्दी डे | 079 68136845 | +91 6353217080 | satabdi@ abcprocure.com |

ई-निविदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करताना कोणत्याही तांत्रिक समर्थनासाठी कृपया खालील क्रमांक वर कॉल करा.

| एस्केलेशन मॅट्रिक्स | | | | |
|---|---|---|---|---|
| नाव | संपर्क क्रमांक | मोबाईल नंबर | ईमेल आयडी | सर्व साठी सामान्य ईमेल आयडी |
| नंदल वालेरा | 079 68136850 | | nandan.v@eptl.in | support@ abcprocure.com |
| कंचन कुमारी | 079 68136849 | | kanchan.k@eptl.in | |
| जयेश त्रिवेदी | 079 68136819 | | jayesh.t@eptl.in | |
| हेमांगी पटेल | 079 68136862 | | hemangi@eptl.in | |
| पंकेश कुमार | 079 68136848 | 9374519729 | pankesh@eptl.in | |
| प्रशांत राजगुरु | 079 68136872 | 8160087732 | prashant@eptl.in | |
| ई-पेमेंट संबधित समर्थनासाठी, payment@epti.in वर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधा. | | | | |

## ई-निविदा सह ई-लिलावाच्या अटी व शर्ती

1. प्रत्येक रेती उपगटासाठी स्थळासाठी वेगवेगळी निविदा खरेदी करावी लागेल. ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-या व्यक्तींनी / संस्थांनी ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन नोंदणीसाठी पुढील माहिती व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे. 1) ई-मेल आयडी, 2) पॅन कार्ड, 3) टॅन नंबर (कंपनी असल्यास), 4) मागील तीन वर्षांचे आयकर विवरणपत्रे (सन 2015-16, 2016-17 2017-18, 5) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र, 6) निवासाचा पुरावा, 7) आधारकार्डची प्रत.

2. ई-निविदा सह ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणा-यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील. 1) नोंदणी फी (फक्त एकदाच) - रु.2950/- 2) फॉर्म फी (प्रत्येक रेती उपगटाकरीता स्वतंत्र) - रु.2000/- (अपसेट प्राईस दहा लाखांपर्यंत असणा-या रेती उपगटाकरीता) रु.5000/- (अपसेट प्राईस दहा लाखापेक्षा जास्त असणा-या रेती उपगटाकरीता), 3) प्रक्रिया फी (प्रत्येक रेती उपगटाकरीता स्वतंत्र) रु.1593/- सदरहू रकमा नेट बँकिंग/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने अदा कराव्या लागतील.

3. ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी अनामत रक्कम म्हणून रु.3,00,000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम, परंतु जर रेती उपगटाची हातची किंमत रुपये 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किमतीच्या 20 टक्के रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणून Online पद्धतीने जमा करावी लागेल. अशा पध्दतीने परिगणीत केलेली रक्कम प्रपत्र "अ" च्या रकाना 11 मध्ये रेतीगटनिहाय दाखविण्यात आली आहे. सदरची रक्कम लिलावधारकांने लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. अर्टी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

4. या प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या इच्छुक व्यक्तींना ई-निविदा व ई-लिलाव या दोन्हीमध्ये भाग घेणे अनिवार्य राहिल. ई-निविदा न भरल्यास ई लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. ज्या व्यक्तींना ई-निविदा भरलेली असेल त्यांना पुन्हा त्याच रेती उपगटांच्या ई-लिलावाकरिता EMD अथवा फॉर्म फी व प्रक्रिया फी भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

5. ई-निविदा व ई-लिलावाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास सदरची ई-निविदा / ई-लिलाव रद्द समजण्यात येईल.

6. प्रत्येक वाळू/रेती उपगटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमत) पेक्षा अधिक रकमेनेच लिलावाच्या बोलीस सुरुवात करणे आवश्यक आहे.

7. ईच्छुक लिलावधारकाने प्रत्येक रेती उपगटासाठी रु.10000/- रक्कमेच्या पटीने प्रत्येक बोली बोलणे आवश्यक राहील.

8. ई-लिलावासाठी ठरविण्यात आलेली वेळ संपण्याच्या अगोदर कोणी शेवटच्या 05 मिनिटांमध्ये बोली लावण्याचा प्रयत्न केल्यास लिलावाच्या कालावधीत 10 मिनिटांची आपोआप वाढ होईल. सदरची वाढ ही तीन वेळाच वाढविण्यात येईल.

9. लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारणेचा किंवा कोणतेहीकारणनदेता नाकारणेचा अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना राहील. सदर निर्णय संबंधितावर बंधनकारक राहील.

10. एखाद्या विशिष्ट अगर सर्व रेती उपगटासाठी ई-निवीदासह ई लिलाव लिलाव प्रक्रिया स्थगित करणे अगर रद्द करणे तसेच प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्याचा कालावधी वाढविणे याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

11. प्रस्तावित सर्व वाळू/रेती उपगटांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे वतीने लिलावाची प्रक्रिया जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात एकाच दिवशी आयोजित करण्यांत आली आहे. लिलावाच्या दिवशी सर्व रेती उपगटांची लिलावाची कार्यवाहीपूर्ण न झाल्यास लगतच्या पुढील कामाच्या दिवशी सकाळी कार्यालयीन वेळेत पुढे सुरु करण्यातयेईल.

12. वाळू/रेती लिलाव/ठेक्याचा कालावधी- 30 सप्टेंबर 2019पर्यंत अथवा मंजूर लिलाव गटातील उत्खननासाठी लिलावधारकास अनुज्ञेय असलेला साठा अथवा अनुज्ञेय साठा वाहतूक करण्यास अनुज्ञेय असलेले वाहतूक पासेस संपेपर्यंत या तीन घटनेपैकी जे आधी घडेल तो पर्यंत राहील.

13. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अनामत रक्कम (EMD) निविदा भरणेपूर्वी 6-8 तास अगोदर online पद्धतीने भरावी लागेल.

14. लिलावाने घ्यावयाच्या वाळू/रेती उपगटात अपेक्षित वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

15. वाळू/रेतीउपगटाच्या लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी हे घेतील. सदर निर्णय जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचेकडून संबंधितास कळविण्यांत येईल.

16. ज्या लिलावधारकाची बोली/ निविदा स्विकारण्यात येईल, त्याला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलाव संपताच त्याच दिवशी प्रकरणपरत्वे online पद्धतीने भरावी लागेल. लिलावापूर्वी शासन जमा केलेली अनामत रक्कम (EMD) ही सदर लिलाव बोलीच्या रकमेच्या 1/4 रकमेत समायोजित करण्यात येईल. तसेच, उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत प्रकरणपरत्वे Online पद्धतीने भरावी लागेल.

17. लिलावात सर्वोच्च देकार देणाऱ्या लिलावधारकाने, लिलावाची संपूर्ण रक्कम विहित मुदतीत शासन जमा केल्यानंतर, शासनाचे महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0316/प्र.क्र.248/ख दिनांक 18 मार्च 2017 मधील तरतुदीनुसार लिलावाची रक्कम रुपये 10 लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रकमेच्या 0.1 टक्का किंवा रकम रु 100/- यापैकी जे अधिक असेल तेवढे तसेच लिलावाची रक्कम रुपये 10 लाखापेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रक्कमेच्या 0.2 टक्के एवढी मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित लिलावधारकाने शासन जमा करुन त्याप्रमाणे विहीत अटी व शर्तीसह करारनामा करणे बंधनकारक आहे. सदर करारनामा केल्यानंतर लिलावधारकास रेती उपगटाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

18. विहित मुदतीनंतर लिलावाची 1/4 व 3/4 रक्कम कोणत्याही परिस्थितीत स्वीकारण्यात येणार नाही. तसेच विहित कालावधीत करारनामा न केल्याने लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही, याची स्पष्ट जाणीव संबंधितास करुन देण्यात येत आहे.

19. लिलाव धारकाने विहित वेळेत करारनामा करुन न दिल्यास तसेच देकाराची उर्वरित 3/4 रक्कम 15 दिवसाच्या कालावधीत न भरल्यास त्याला रेती उपगटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा वाळू/रेती उपगटाचा फेरलिलाव करण्यात येईल व त्याने भरणा केलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल.

20. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमती पेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

21. सर्वोच्च बोलीद्वारे लिलावधारकास रेती उपगट निश्चित झाल्यास आणि त्याने लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 रक्कम जमा केल्यास असा लिलावधारक व संबंधितांना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी (खनिकर्म शाखा) यांच्याकडून SMATS प्रणालीचा अवलंब करणे सुलभ व्हावे, याद्दष्टीने प्रशिक्षण देण्यात येईल.

22. लिलावधारक/परवानाधारकास जिल्हापरिषद/पंचायत समिती यांनी विहित केलेले कर/शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

23. लिलावासंदर्भात काही तक्रारी/आक्षेप/सूचना प्राप्त झाल्यास प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी त्याची तपासणी/चौकशी करतील, तपासणी/चौकशी अंती लिलाव नाकारण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास लिलावाची प्रक्रिया स्थगित करण्यात येईल.

24. वाळू/रेती उपगटांच्या लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा तसेच निविदाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा कमी असल्यास त्याची सविस्तरकारणे नोंदवून त्या वाळू/रेती उपगटाचा दोनदा फेर लिलाव करण्यात येईल.

25. एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी /अडथळे आल्यास लिलावधारकाने याबाबत संबंधित तहसिलदार यांना माहिती देणे आवश्यक राहील. संबंधित तहसिलदार यांनी प्राप्त तक्रारी नुसार त्या रेती उपगटातून उत्खनन करण्यात येणाऱ्या अडचणींची चौकशी करुन, त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी/अपरजिल्हाधिकारी यांना सादर केल्यानंतर, सदर तक्रारीच्या अनुषंगाने गरजेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, यांच्याशी विचार विनिमय करुन 15 दिवसात निर्णय घेण्यात येईल.

26. एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याची अथवा कोणत्याही कारणास्तव वाळू/रेती उपगट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचे व वाळू/रेती उपगट बदलून देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना राहणार नाहीत. अपवादात्मक परिस्थितीत याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

27. शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लिलाव करण्यात आलेल्या वाळू/रेती उपगटा संदर्भात कालांतराने, वाळू/रेती उपगटातून लिलावाच्या अटी/शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होण्यासंबंधी किंवा अवैध/नियमबाहय वाळू उत्खननामुळे तसेच वाहतूकीमुळे खाडीकाठच्या शेतीची/रस्त्यांची हानी होण्यासंबंधी किंवा तत्सम स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून अनेक वेळा करण्यांत येतात. अशा तक्रारींची दखल घेऊन त्यासंदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत आली आहे.

28. लिलावात दिलेल्या/परवाना दिलेल्या वाळू/रेती उपगटातून लिलावधारक/परवानाधारकास उत्खनन करण्यास स्थानिक विरोध झाल्यास किंवा नैसर्गिक किंवा लिलावधारक/परवानाधारकाच्या नियंत्रणाबाहेरील सबळ कारणामुळे अशा वाळू/रेती उपगटात उत्खनन होवू शकले नाही तर, लिलावधारक/परवानाधारकाने तक्रार/अर्ज करुन ती बाब संबंधित जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी. त्याबाबत चौकशी करुन वस्तूस्थिती मा. विभागीय आयुक्त, यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर पुढील उचित कार्यवाहीसाठी सादर करण्यांत येईल. याअनुषंगाने समितीने विहित कार्यवाही करुन 15 दिवसांत तक्रारी संदर्भात योग्य तो निर्णय संबंधितांना कळविण्यांत येईल.

29. जर तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात उपरोक्त समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल तर अशा तक्रारदाराला त्याबाबत शासनाकडे अपील करता येईल. याप्रमाणे प्राप्त अपीलावर तसेच यासंदर्भात शासनस्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारी बाबत शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.

30. लिलावाने/परवान्याने वाळू/रेती उत्खननसाठी केलेल्या करारनाम्याच्या कालावधीत शासनाने तो लिलाव/परवाना रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्रात उत्खनन करण्यास किंवा वाळू/रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास/परवानाधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

31. लिलावधारकास/परवानाधारकास कोणत्याही वैध कारणामुळे उदा. ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा रेती उपगटाचा ताबा प्राप्त न झाल्यास आणि या कारणास्तव लिलावाचा ठेका/परवाना रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव/परवाना घेतला असेल त्या रकमेच्या प्रमाणात त्याला शासन मान्यतेने परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची/परवान्याची रक्कम, लिलावातील/परवान्यातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

32. लिलावामध्ये संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच वारंवार हेतु पुरस्कर न्यायालयीन दावे उपस्थित करणाऱ्या लिलावधारकास काळयायादीत (Black List) टाकण्याबाबत व लिलावात सहभागी होण्यास प्रतिबंधकरण्याचे जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना राहतील.

33. लिलावधारकाने लिलावाची उर्वरित रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसात न भरल्यास अशा लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळयायादीत टाकून कोणत्याही जिल्हयात लिलावात भाग घेण्यासाठी अपात्र ठरविण्यांत येईल.

34. लिलावधारकाने/परवानाधारकाने मंजूर वाळू/रेती उपगटाच्या चिन्हांकित केलेल्या क्षेत्रा बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन केल्यास, तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने निश्चित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल तसेच विहित केलेल्या क्षेत्राबाहेर उत्खनन केल्यास, सदर उत्खनन अवैध समजून त्याच्याविरुध्द प्रचलित नियमा नुसार कारवाई करण्यात येईल. तसेच त्याचा ठेका/परवाना रद्द करुन फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल व जमा केलेली सर्व रक्कम जप्त करण्यांत येईल.

35. वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतुक/साठवणूकीची प्रकरणे उघडकीस आल्यास व अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार/लिलावधारक/परवानाधारक/वाहनमालक/वाहनचालक दोषी आढळल्यास त्याच्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील नियम 48 (7) व (8) व महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम 1968 मधील नियम 9 मधील तरतूदीनुसार तसेच शासनाचे नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे इ. कारवाई करण्यात येईल. तसेच वाळू/रेतीचे अवैध उत्खनन/वाहतूक इत्यादीच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करताना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास व अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा

संघटित गुन्हेगारी विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार मोक्कासारख्या अधिनियमान्वये कारवाई करण्यांत येईल.

36. सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्गसुकर व्हावा या हेतुने वाळू उत्खनन केले जाते. त्यामुळे लिलाव/परवाना मंजूर केल्यानंतर लिलावधारकाने/परवानाधारकाने वाळू/रेतीउपगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून एका आठवडयाच्या आत प्रमाणशीर उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील. लिलावधारक/परवानाधारक उत्खनन प्रमाणशीर करतो किंवा कसे याबाबत सनियंत्रण करण्यांत येईल. प्रमाणशीर उत्खननाबाबत काही तक्रारी असतील तर त्याचे निवारण वर उल्लेखित समिती करील. या संदर्भात समितीचा निर्णय अंतिम राहील. याकामी आवश्यक ते तांत्रिक सहकार्य महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे राहील. जर लिलावधारक/परवानाधारक प्रमाणशीर उत्खनन करीत नसेल तर त्याने शासनास लिलावापोटी जमा केलेल्या रकमे व्यतिरिक्त नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी व पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून येणारा खर्च हा दंडात्मक रक्कम म्हणून लिलावधारक/परवानाधारका कडून वसूल करण्यांत येईल. तसेच लिलाव रद्द करण्यांत येऊन लिलावात भरलेली रक्कम जप्त करण्यांत येईल.

37. **वाळू/रेती उत्खननावरील सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती:-**

वाळू / रेती उत्खननावरील सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्तीपुढील प्रमाणे राहतील. सदर अटींचा समावेश संबंधित लिलावधारक/परवानाधारका सोबत करावयाच्या करारपत्रात करण्यांत येईल.

i. लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण विषयक व सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्राच्या नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

ii. लिलावधारक/परवानाधारक यांनी मंजूर उपगटात रेती/वाळू उत्खनन व तत्सम काम करणा-या कामगाराकडे आधारकार्ड ( Unique Identification Numbar) असणे बंधनकारक राहिल.

iii. वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

iv. लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या रेती उपगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील.विहित केलेल्या क्षेत्राच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

v. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड निश्चित करतील तितक्या खोली पर्यंतच लिलावधारक/परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

vi. विहित केलेल्या खोली पेक्षा जास्त खोलीपर्यंत उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

vii. रेल्वे पुल व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

viii. वाळू/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/ नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा

हानीची/नुकसानीची परिगणना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्या कडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूली प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

ix. वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासबाबत महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक गौखनि-10/0216/प्र.क्र.158/ख, दिनांक 22.03.2016 नूसार शासनाच्या वतीने वाहतूक पास (Transport Permit) छापून घेण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्यानूसार जिल्हाधिकारी यांनी वाळूच्या वाहतूकीसाठी आवश्यक तेवढे वाहतूक पास छापून घेवून संबंधित लिलावधारकास टप्याटप्याने वापरण्यास द्यावयाचे आहेत. लिलावधारकाने त्यांना प्राप्त झालेले वाहतूक पासचा वापर करताना प्रथम अनुक्रमांकाचे वाहतूक पुस्तक संपल्यानंतर त्यापुढील क्रमांकाच्या वाहतूक पुस्तकातील वाहतूक पसचा वापर करणेचा आहे. तसेच वाहतूक पास वापरल्या संबंधिचा अहवाल सादर केल्यानंतरच पुढील वाहतूक पास देण्यात येतील. वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासेस देण्याबाबतची कार्यपध्दती केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक काआ 141(अ), दिनांक 15.01.2016 मधील परिशिष्ट 12 मध्ये नमूद केलेली असून सदरकार्यपद्धतीचा अवलंब करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील, व सदर कार्यपध्दीसाठी येणारा खर्च लिलावधारकास करावा लागेल. सदर कार्यपध्दती थोडक्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1) वाहतूक पासेस (रॉयल्टी पासेस)ची वैशिष्टे खालीलप्रमाणे असतील.

अ) इंडीयन बँक असोशिएशन ने प्रमाणीत केलेल्या चुंबकीय शाईने वर्णाची ओळख (MICR- Magnetic ink Recognition) होईल, अशा पेपरवर छापील केलेले असतील.

आ) त्यावर अद्वितीय (विशिष्ट) बारकोड (Unique Barcode) असेल.

इ) अद्वितीय (विशिष्ट) बारकोड हा जलद प्रतिसाद (Quick Response) देणारा असेल.

ई) सदर बारकोडमध्ये अदृश्य असे चिन्ह (Invisible Mark) असेल.

उ) सदर बारकोडमध्ये वॉटर मार्क (Water Mark) असेल.

ऊ) वाहतूक पासेस हे फरारी शाईच्या पार्श्वभूमीचे (Fugituve Ink Background) असतील.

2) वाळूपट्टा स्थळावर ठेकेदाराने पुढील आवश्यक बाबीची तरतूद करणे बंधनकारक आहे.

अ) पाच हेक्टरपर्यंत लहान असलेल्या रेती प्लॉटसाठी अँड्रॉईड बेस्ड इंटरनेट व सिमकार्ड असलेला स्मार्ट फोन ठेवण्यात यावा.

आ) पाच हेक्टरपेक्षा जास्त असलेल्या रेती प्लॉटसाठी 24 तास वीज पुरवठा करणा-या साधनासह सीसीटीव्ही कॅमेरा, इंटरनेट कनेक्शनसह कॉम्प्युटरची तरतूद ठेकेदाराने स्वखर्चाने करावी.

इ) ठेक्यावर **24 x7** तास चालणारे **CC TV Camera** आणि **Halogen Lights** बसविणे आवश्यक राहील. किमान 10 सी.सी.टि.व्ही.कॅमेरा व **Halogen Lights** लावणे आवश्यक आहे. सदर **CCTV Camera** व **Halogen Lights** अशा पद्वतीने बसवावे की त्यात पुढील सर्व जागा त्याच्या कार्यकक्षेत येतील.

i) ज्या ठिकाणी पावती फाडण्याचे काम होते ती जागा.

ii) वाळू ठेक्यांचा स्पॉट वरुन वाळू आणि वाळू साठवण्याचे स्पॉट वरुन ज्या ठिकाणाहून गाडया बाहेर निघू शकतात व आत जाऊ शकतात अशा मार्गावर (entry & exit points), ज्या ठिकाणी वाळु उत्खनन होते अशा जागी, अशा प्रकारे CCTV Camera लावणे आवश्यक आहे. त्या वाहनांचा गाडी क्रमांक त्यामध्ये नोंदविला जाईल. सर्व ठेके सुरु झाल्यापासून संपेपर्यंत संपूर्ण ठेक्यांचे बॅकअप कायम स्वरुपी जतन केले जाईल.

iii) वाळू ठेक्याची जास्तीत जास्त जागा **cover** होतील अशा उंच ठिकाणी **CCTV Camera** लावावे कि जेणेकरुन संपूर्ण जागा **cover** करता येईल.

iv) प्रत्येक ठेकेदाराने वाळू ठेक्याच्या **CCTV Camera** मधील फुटेज प्रत्येक आठवडयाला जिल्हाधिकारी कार्यालयास व तहसील कार्यालयांस सी.डी. मध्ये किंवा पेन ड्राईव्ह किंवा **external hard disk** मध्ये सादर करावे.

v) **CCTV Camera** चे **resolution** इतके असावे कि माणसांचे चेहरे स्पष्टपणे ओळखता आले पाहीजेत आणि गाडयांचे नंबर स्पष्टपणे दिसले पाहीजेत.

vi) सर्व सी.सी.टिव्ही कॅमे-याचे फुटेज मागणी प्रमाणे अधिका-यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच हे थेट फुटेज मागणीप्रमाणे नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल.

3) वाहतूक परवाना किंवा पावती स्कॅनिंग आणि सर्व्हरवर अपलोडबाबत ठेकेदाराने खालील पद्धत अवलंबणे बंधनकारक आहे.

अ) संकेत स्थळाचा वापर करुन (Website) - वाहतूक पासेस स्कॅन करुन अपलोड करण्यासाठी बारकोड स्कॅनर व संकेतस्थळाचा वापर करावा लागेल.

आ) वाहतूक पासेस स्कॅन करण्यासाठी व अपलोड करण्यासाठी आवश्यक सॉफ्टवेअर/ॲप्लीकेशन व त्यासाठी इंटरनेट कनेक्शनची तरतूद ठेकेदाराने स्वखर्चाने करावी लागेल.

इ) भ्रमणध्वनी द्वारे पाठविण्यात येणा-या लघुसंदेश (SMS)-द्वारे वाहतुक पासेसची माहिती सर्व्हरवर अपलोड करावी लागेल व त्याद्वारे एक अद्वितीय इन्वाईस क्रमांक तयार होईल.

4) प्रणालीची प्रस्तावित कार्यपद्धती.

जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रिंटीग प्रेस मध्येच ठेकेदाराने वाहतूक पासेस छापून घ्यावेत व छापलेली पावती पुस्तके जिल्हाधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावीत. जिल्हाधिकारी वाहतूक पासेस ठेकेदारास देते वेळी त्या सर्व पासेसची नोंद संबंधित ठेकेदाराच्या नावांवर सर्व्हरवर करतील. वाहतूक पासेसचे परिमाण अगोदर ठरविलेले असेल व ठेकेदारास द्यावयाच्या पासेसची एकुण संख्या रेतीगटाच्या परिमाणा एवढी असेल. रेतीची वाहतूक करताना वाहनाच्या क्षमते नुसारच वाहतूक परवाना पासेस देणे लिलावधारकावर बंधनकारक राहील

जेंव्हा वाहतूक पासेस स्कॅन करुन सर्व्हरवर अपलोड करण्यात येतील तेंव्हा त्या बारकोड साठी एक अद्वितीय इन्वाईस क्रमांक मिळेल व त्याची ठराविक वैधता असेल ज्यामुळे ठेकेदाराने उत्खनन केलेली सर्व माहिती सर्वरवर मिळू शकेल. वाहतूक पासेसचा दूबार वापर करता येणार नाही याबाबतची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

5) वाहतूक मार्गावर वाहनांची तपासणी -

महसूल कर्मचारी वाहतुक पासेसची वैधता संकेतस्थळ, अँड्रॉईड बेस्ड ॲप्लीकेशनवर एसएमएस चा वापर करुन निश्चित करतील.

6) वाहन बिघाड नोंदविण्यासाठी -

रेती वाहतूक करणा-या वाहनांबाबतची माहिती तात्काळ मिळण्यासाठी कॅाल सेंटरची सोय ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागेल; जेणेकरुन रेती वाहतूक करणा-या वाहनामध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यास, त्या वाहनाची दुरुस्ती करण्यास लागलेल्या वेळे एवढी वैधता वाढवून घ्यावयाची झाल्यास वाहन धारक तात्काळ त्याबाबतचा विहीत स्वरुपाचा एसएमएस किंवा फोन करुनकॅाल सेंटरला कळवील तसेच वाहन सुरु झाल्यानंतर देखील त्याबाबतची माहिती तात्काळ कॅाल सेंटरला कळवली जाईल.

7) वाहनाचे ट्रॅकींग -

वाहन ज्या ठिकाणावरुन निघते त्या रेती घाटापासून ते वाळू विक्री ज्या ठिकाणी केली जाते त्या ठिकाणा पर्यंतच्या मार्गावरील वाहनांचे "ट्रॅकिंग" चेकनाके, GPS उपकरणे व RFID टॅगद्वारे केले जाईल. यासाठी वाहतूक करणा-या वाहनाना GPS उपकरण, RFID टॅग (अनुषंगिक वेबसाईट व सॉफ्टवेअर सह) बसविणे लिलावधारकांना बंधनकारक राहिल.

8) उपरोक्त थोडक्यात नमूद केलेली कार्यपद्धती व अधिसूचनेतील व कार्यपद्धतीतील तफावत/संभ्रम निर्माण झाल्यास अधिसूचनेतील कार्यपद्धती अंतीम समजणेत येईल.

x. लिलावधारकाने मंजूर क्षेत्रातून वाळू / रेती उत्खनन करताना नैसर्गिक साधनसंपत्तीस व पर्यावरणास धोका पोहोचणार नाही याची सर्व खबरदारी घेणे आवश्यक आहे.

xi. लिलावधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

xii. लिलाव धारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

xiii. लिलावधारकाने वाळूची/रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थाना प्राधान्य दिले पाहिजे.

xiv. वाळू उत्खननासाठी किंवा वाहतूकीसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांचेकडे नोंदणी केलेल्या बोटी, बार्ज व ड्रेझर याचाच वापर केला जाईल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच सदर नोंदणी केलेल्या ड्रेझर, बोटी, बार्ज वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे वाहनांना

जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहिल. वाळू उत्खनन करताना किंवा वाहतूक करताना नोंदणी न केलेली व परवानगी न घेतलेली बोट, ड्रेझर, व बार्ज तसेच वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे कोणतेही वाहन आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच सीआरझेड क्षेत्रात उत्खनन केलेली वाळू ही मुंबईकडे वाहतूक करताना रस्त्याने वाहतूक न करता जलमार्गे / लोहमार्गे करण्याचे प्रयत्न करावेत. परवानगी घेण्यात आल्यानंतर युनिक नंबर देण्यात येईल. सदर नंबर ड्रेझर, बार्ज, बोटीचे तसेच वाहतूक करणा-या वाहनाचे दर्शनी भागावर ठळक अक्षरात पेंट करणे आवश्यक राहिल. सदर बोटी, ड्रेझर, बार्ज व वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे वाहन हे परवानगी दिलेल्या कारणासाठीच वापरणे बंधनकारक राहिल. तसेच उत्खननासाठी/ वाहतूकीसाठी वापरात येणा-या बोटी, ड्रेझर, बार्ज यांच्यावर फ्लड लाईट ची सुविधा असणे बंधनकारक राहिल.

xv. जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणा-या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतुकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येतील याबाबत लिलावधारक / परवानाधारक यांच्यासोबत चर्चा करुन जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी हे अंतिम निर्णय घेतील. त्यांचे पालन करणे लिलावधारक / परवानाधारक यांच्यावर बंधनकारक राहिल.

xvi. लिलावधारकाने वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.

xvii. लिलावधारकाने रेतीच्या/वाळूच्या वाहतुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी म्हणजे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने प्रमाणित व स्वाक्षरित केलेली वाहतुक पावती वाळू/रेतीची वाहतुक करणाऱ्या प्रत्येक वाहनासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. निविदाधारकाने त्याच्या ई-निविदेतील नमूद स्थळातील रेती/वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पावती द्यावी. कोणतेही वाहन त्या पेक्षा अधिक परिमाणची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्यावाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटरवाहन कायद्यानुसार कारवाई केली जाईल.

xviii. लिलाव धारकाने रेती/वाळू उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास निविदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

xix. लिलावधारकाने करारनाम्यातील अटी व शर्तीचे, गौणखनिज उत्खनन नियमातील आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 मधील लागू असलेल्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील त्याचप्रमाणे लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूचा उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहीजे.

xx. वाळूचे/ रेतीचे उत्खनन करतेवेळी काही प्रमुख खनिजे आढळुन आल्यास संबंधित लिलावधारकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांना सात दिवसात कळविणे बंधनकारक राहील.

xxi. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणूक,ज्या जिल्हयातील असेल त्या जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी आवश्यक असलेली अकृषक परवान्यासह जमीन

उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ई-निविदाधारकाची असेल. वाळू / रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्यावाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्यावाळूचा/रेतीचासाठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही, तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत निविदाधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा / परवान्याचा कालावधी संपल्या नंतर तसेच वर उल्लेखित 10 दिवसासाठी मुदत संपल्या नंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/ रेती साठा करण्यास परवानगी देण्यात येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पास देण्यात येणार नाहीत.

xxii. शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव-ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

xxiii. लिलावधारक / परवानाधारकाने वाहतूक पासचा वापर करताना प्राप्त झालेल्या वाहतूक पासमधील प्रथम अनुक्रमाकांचे वाहतूक पासचे पुस्तक संपल्यानंतर त्यापुढील अनुक्रमांकाच्या वाहतूक पुस्तकातील वाहतूक पासचा वापर करणेचा आहे. तसेच वाहतूक पासामधील अनुक्रमांक 9 ते 13 समोर संपूर्ण माहिती भरणे बंधनकारक आहे.

xxiv. लिलावधारक / परवानाधारकाने त्यास मंजूर केलेल्या रेती उप गटातूनच उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व वाळु खरेदी करणाऱ्याचे नांव व पत्ता, वाहतुक पास क्रमांक, दिनांक दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास सादर करणे सक्तीचे आहे. ज्या लिलावधारकाकडून / परवानाधारकाकडून मासिक विवरणपत्र विहीत वेळेत सादर करण्यात येणार नाही, त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे तसेच त्यांचा ठेका / परवाना रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांना राहतील.

xxv. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना नौकानयन मार्गातील अडथळे दुर करणे तसेच जल-जीवन तसेच जल संपत्तीच्या हिताच्या दृष्टीने वाळू / रेती उत्खननासाठी यांत्रिक साधनांचा वापर करण्यास उचित बंधने घालता येतील.

38. निविदा धारकाने त्यास नेमुन दिलेल्या जागेतून उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व वाळु खरेदी करणाऱ्याचे नांव व पत्ता, वाहतुक पास क्रमांक, दिनांक दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

39. लिलावात सर्वोच्च देकारसह, सर्वोच्च देकारच्या- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे कडील जल सर्वेक्षण शुल्क 10% तसेच 10%जल सर्वेक्षण शुल्कावर 18 % जीएसटी (वस्तू व सेवाकर) रक्कमही जलआलेखक सर्वेक्षण शुल्कापोटी (हायड्रोग्राफीक सर्वे फी) लिलावाच्या दिवशी "Hydrographer, Maharashtra Meritime Board, Mumbai"यांच्या नांवाने काढलेला धनाकर्ष जमा करणे लिलावधारकास अनिवार्य राहिल. केंद्र शासनाने दिनांक 1 जुलै, 2017 पासून करप्रणाली बाबत नवीन धोरण निर्गमीत केलेले आहे, त्यानूसार आकारले जाणारे कर, टी.सी.एस.2.06 % जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी **(D.M.F.)**, 10 % व पर्यावरण शुल्क 2 % या रकमा संबंधीत लिलावधारकास Online पद्धतीने अदा करणे अनिवार्य आहे.

40. मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, पुणे यांजकडील ॲप्लीकेशन क्रमांक 34(टीएचसी)/2013 (WZ) मध्ये दिनांक 29/05/2014 रोजी दिलेला निर्णय व मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, मुख्य खंडपीठ नवी दिल्ली यांनी

MISCELLANEOUS APPLLICATION NO.107/2018 IN ORIGINAL APPLICATION NO.18/2018 (W.Z.) मध्ये दिनांक 30/05/2018 रोजी दिलेल्या निर्णय व या विषयाच्या अनुषंगाने विविध न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेले आदेश तसेच सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक 21 मे, 2015, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडील सी.आर.झेड. विषयक अनुमती व शासन, पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती/सर्वेक्षण अहवालामधील सर्व अटी/शर्ती लिलावधारक यांना बंधनकारक असून, त्याची अंमलबजावणी व काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

41. सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक 21 मे, 2015, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडील सी.आर.झेड विषयक अनुमती व शासन, पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती/सर्वेक्षण अहवालामधील सर्व अटी/शर्ती लिलावधारक यांना बंधनकारक असून, त्याची अंमलबजावणी व काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

42. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती पत्र जा.क्र. ममेबो/मुकाअ/जआ/टी-99x/दाभोळ-जयगड/2017-18/808 दिनांक 04.09.2017 मधील व अनुमती पत्र जा.क्र. ममेबो/मुकाअ/जआ/टी-99xl/यां.उत्खनन-रत्नागिरी/2018-19/968 दिनांक 04.10.2018 मधील अटी व शर्ती -

i. उत्खननावेळी रेती व्यतिरीक्त निघालेली माती, खडे इत्यादी खाडी/नदीमध्ये किंवा तटीय विनियमन क्षेत्रात टाकू नयेत. अशा प्रकारची रेती व्यतिरीक्त माती, गाळ, खडे हे लहान खड्डे भरण्यासाठी व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वापरावेत.

ii. तटीय विनियमन क्षेत्रामध्ये मजुरांची निवासी छावणी, यांत्रिक सामग्री व साहित्य साठवणुकीस परवानगी दिली जाणार नाही.

iii. या ठिकाणी निर्माण होणारे सांडपाणी खाडीपात्रात सोडता कामा नये.

iv. सांडपाणी प्रक्रियेसाठीची यंत्रणा तटीय विनियमन क्षेत्राच्या बाहेर उभारण्यात यावी.

v. कांदळवनाचा नाश केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

vi. खाडीपात्रामध्ये भराव टाकला जाणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

vii. थोडया प्रमाणात पाणी गढूळ झाले तरी सागरी जीवांच्या चयापचय क्रियेत व प्रजननामध्ये अडथळे निर्माण होत असल्याने यांत्रिक पध्दतीने वाळू काढताना सागरी वातावरणाचे नुकसान होणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी.

viii. यांत्रिक पध्दतीने काढलेल्या रेतीची वाहतुक व साठवणुक करताना नदी/खाडीच्या किनाऱ्यावरील पर्यावरण संतुलन बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी.

ix. कांदळवनाच्या संरक्षणासाठी व सागरी पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आवश्यक ती विशेष काळजी घ्यावी.

x. इतर संबंधित विभागांच्या आवश्यक त्या परवानग्या घेतल्यानंतरच रेती उत्खनन सुरु करावे.

xi. पावसाळी हंगामामध्ये लिलावधारकाने खालील नमूद केलेल्या मुद्यांचे पालन करावे.

(a) लिलावधारक हे नदी/खाडी पात्रामध्ये उत्खनन करणार असल्याने त्यांनी खुल्या समुद्रामध्ये जाऊ नये.

(b) उत्खनन कालावधीत पावसाळी हंगाम असल्यामुळे ज्यावेळी हवामान खात्याकडून अतिवृष्टी/खराब हवामानाचा इशारा दिला जाईल, त्यावेळी लिलावधारकांने उत्खनन करु नये.

(c) उत्खनन कालावधी हा पावसाळी असल्यामुळे उत्खनन साधनांचे तसेच इतर बाबींचे नुकसान/अपघात झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही लिलावधारकाची असेल.

xii. शासन निर्णय दिनांक 21/05/2015 च्या वाळू/रेती निर्गती धोरणातील परिच्छेद C1(3) मध्ये नमुद असल्याप्रमाणे, लिलावधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळू गटाच्या ठिकाणी फलक/बोयॅ लावून उत्खनन क्षेत्राची उपगटाची परिसीमा निश्चित करुन गटाची सिमा दर्शविणारे बॉय (Buoy) टाकणे अनिवार्य राहिल. गटाच्या सिमांकनाकरीता लिलावधारकाने बॉय उपलब्ध करुन दिल्यानंतर जलआलेखक, महाराष्ट्र सागरी मंडळ कार्यालयाकडून जीपीएस उपकरणाद्वारे गटाची भौगोलिक स्थिती (Latitude & Longitude) प्रत्यक्ष स्थळी दर्शविण्यात येईल. त्याकरीता शासन गृहविभाग अधिसूचना दिनांक 24/05/2016 अन्वये निश्चित केलेले सर्व्हेक्षण शुल्क प्रतिदिन रु. 58,000/- प्रमाणे लागणा-या कालावधीचे सर्व्हेक्षण शुल्क आकारले जाईल. लिलावधारकाने सर्व्हेक्षण शुल्क भरणा केल्यानंतरच उप गटांचे सिमांकन निश्चित करुन देण्यात येईल. **उपगटाची परिसीमा बॉय (Buoy) टाकून निश्चित केल्याशिवाय लिलावधारकाला उत्खननाचेआदेश दिले जाणार नाहीत.**

xiii. लिलावधारकाकडून ज्या क्षेत्रात उत्खनन करण्यात येणार आहे ते क्षेत्र ज्या बंदर हद्दीत येईल, त्या संबंधित बंदर निरिक्षक/सहाय्यक बंदर निरिक्षक, महाराष्ट्र सागरी मंडळ कार्यालयाकडून "चढणावळ व उतरणावळ शुल्क" (Landing & Shipping fees) लिलावधारकाकडून भरणा करणे अनिवार्य राहील.

xiv. उत्खनन गटामध्ये लिलावधारकाकडून ड्रेझर/यांत्रिकी पध्दतीने उत्खनन सुरु असताना गाळ (Non Sand/Coarse Meterial) पुन्हा खाडीपात्रामध्ये पडणार नाही, ह्याची लिलावधारकाने खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर लिलावधारकाकडून अशा अटी/शर्तीचे उल्लंघन झाल्यास शासन वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक 21/05/2015 मधील तरतूदीनुसार लिलावधारकांवर त्वरीत कारवाई करण्यात येईल.

xv. लिलावधारकास प्रत्येक उपगटामध्ये एक (1) ड्रेझरपेक्षा जास्त म्हणजेच राखीव (Stand By) ड्रेझर ठेवता येणार नाही.

43. ई-निविदावई-लिलावाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्यांचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**<u>विशेष निर्देश, अटी व शर्ती</u>**

1. कोणतेही वाहन वहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळु वाहुन नेत असल्याचे आढळुन आल्यास त्या वाहनातील संपुर्ण गौणखनिज अवैध आहे, असे समजुन त्यावर प्रचलित नियमानुसार दंडात्मक कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. तसेच सदर वाहनांवर मोटार कायद्यानुसार व अन्य प्रचलित कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अ)** सदर वाहनाचा वाहतुक परवाना पहिल्या गुन्ह्यासाठी **30** दिवस,दुस-या गुन्ह्यासाठी **60** दिवस व तिस-या गुन्ह्यासाठी **90** दिवस याप्रकारे निलबिंत करण्यात येईल.

**ब)** वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायन्सन्सवर मोटार वाहन कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हया करीता सहा महिन्यांसाठी निलंबित केले जाईल, अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

2. प्रत्येक वाळू साठयापासून बाहेर निघण्यासाठी महसूल विभागाकडून मान्यता देण्यात येईल तेवढेच आत येण्याचे **(EntryRoute)** व बाहेर जाण्याचे मार्ग **(Exit Route)** असतील. हेच मार्गवाहतुकीसाठी वापरणे बंधनकारक राहिल. **मान्यता देण्यात आलेल्या आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मार्गाशिवाय** इतर मार्ग असल्यास ते बंद करावे लागतील.अशा ठिकाणांहून वाहतुक करणे शक्य होणार नाही, अशा प्रकारची आवश्यक ती सर्व उपाययोजना ठेकेदाराने स्वत: करावी. **उदा.** मोठे बोर्ड लावणे, च-या खोदणे इत्यादी ठेकेदाराने स्वत:चे खर्चाने

करणे आवश्यक राहील. तसेच ज्या मार्गावरचेक पोस्ट लावण्यात येईल त्या ठिकाणावरुन वाहतूकीसाठीचे प्रत्येक वाहन जाणे बंधनकारक राहिल. मान्यता दिलेल्या मार्गाशिवाय इतर मार्गावर वाहतूक केल्याचे आढळून आल्यास सदर वाहतूक अवैध समजून दंडात्मक व वाहन जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

3. प्रमाणित करुन दिलेल्या (Entry/Exit Route) मार्गावर Check Post लावून Flood Lights, CCTV, CCTV Footage Real time live streaming करणेसाठी ब्राडबॅड इंटरनेट सुविधा, RFID Tag Reader, संगणक, प्रिंटर, पॉवर बॅकअप इ. सुविधा करणे आवश्यक राहिल. तसेच Check Post वर 24 तास मॅनेजमेंट करणेसाठी किमान तीन कर्मचारी नेमणे आवश्यक राहिल. उपरोक्त बाबींसाठी आवश्यक असणारा खर्च लिलावधारकयांनी करणेचा आहे.

4. एकापेक्षा जास्त वाळू गटासाठी एकत्रित चेक पोस्ट लावणेची आवश्यकता असल्यास सर्व चेक पोस्टवर वरील प्रमाणे होणारा खर्च विभागून सर्व संबंधित लिलावधारकांनी करण्याचा आहे. अशा चेक पोस्टची आवश्यकता व सदर चेक पोस्टवर होणारा खर्च लिलावधारकांना विभागून देण्याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी स्तरावर घेण्यात येईल.

5. वाळु उत्खननाचा व पावती पुस्तकाचा हिशोब वेळच्या वेळी न देणे. आपल्या स्थळप्रती मध्ये आणि वाहतुक करणा-या वाहन चालकाच्या प्रतिमध्ये तफावत असणे, इ. बाबीसुद्धा शर्तभंग समजण्यात येतील. अशा बाबी निर्दशनास आल्यास संबंधित ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येईल.

6. वाहतुक ठेकेदाराने ठेक्याच्या स्पॉटवर विक्री केलेल्या वाळुबाबतच्या नोंदीचे रजिष्टर ठेवणे आवश्यक असुन ठेकेदारास देण्यात आलेल्या पावत्यांचा हिशोब दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित तहसील कार्यालयास सादर करावा लागेल. ठेकेदाराकडे गौणखनिज/वाळु उत्खननाबाबत नियमानुसार ठेवण्यात आलेल्या रजिष्टर मधील नोंदी व वाळु वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या पावत्यांसह तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रतिसह हिशोब सादर करावा. लिलावधारकाने विहित मुदतीत मासिक विवरणपत्र सादर केले नाहीतर ठेका रद्द करणे तसेच दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

7. उत्खनन केलेल्या वाळू/रेतीची साठवणूक लिलावधारक / परवानाधारक यांनी अकृर्षिक परवाना घेतलेल्या जागेवरच करणे बंधनकारक राहिल. जी जागा साठवणूकीसाठी वापरण्यात येणार आहे त्या जागेची अकृर्षिक परवानगी संबंधित उपविभागीय अधिकारी/तहसीलदार यांचेकडून घेणे आवश्यक राहिल. परवानगी व्यतिरीक्त इतर जागेवर साठा केल्याचे आढळल्यास सदर रेती/वाळू अवैध समजून दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.

8. वाळु गटाच्या स्थळांचे एकत्रीकरण करणे किंवा विभाजन करण्याचे संपुर्ण अधिकार हा जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

9. याशिवाय जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती, तसेच अवैध वाळू वाहतूक थांबविणेसाठी देण्यात येणा-या सूचना/उपाययोजना संबंधित ठेकेदारांने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहिल.

10. शासन निर्धारीत करील ती संगणकीय प्रणाली ठेकेदारांना वापरणे बंधनकारक राहील आणि त्यासाठी आवश्यक **Hardware** आणि इतर सुविधा स्वखर्चाने ठेकेदाराला कराव्या लागतील.

11. कोणत्याही अटी व शर्तीचा एकदा देखील भंग झाल्यास जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी पुर्ण अनामत जप्त करुन ठेका रद्द करणे व इतर कायदेशीर कारवाई करणे कायदेशीर राहील.

12. **कोणतेही कारण न देता वाळू ठेका रदद करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवला आहे.**

सही/- xxx
(सुनील चव्हाण)
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

स्थळ :- रत्नागिरी
दिनांक : - 30/03/2019

(प्रतिज्ञापत्र रु.100/-चे स्टॅप पेपरवर)

**<u>वाळू/रेती उपगट निर्गतीकरीता ई-निविदा/ई-लिलावधारकाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.</u>**

मी, मे/श्री. ............................................. रा, .............., ता. ............... जि............ कारणे सत्यप्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, --------------------------------------- या रेती उपगटा पैकी ड्रेझर रेती उपगट क्र...........(गटाचे नांव .................................) साठी ई-निविदा/ई-लिलावासाठी सन 2018-2019 या वर्षासाठी ऑनलाईन अर्ज भरलेला आहे. त्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्कॅनप्रती ई-निविदे सोबत जोडलेल्या आहेत.

उक्त रेती उपगटाची - निविदा/लिलावासाठी अर्ज भरण्यापूर्वी सदर रेती उपगटाची मी, मोक्यावर जाऊन पाहणी केली असून रेती उपगटाची स्थिती, रेती साठा व्यवस्थित दिसून आल्यावरच मी माझ्या मर्जीनुसार अर्ज भरलेला आहे. भविष्यात नैसर्गिकरित्या अथवा अन्य कारणामुळे गटाच्या स्थितीत बिघाड होऊन किंवा शासकीय रस्ता उपलब्ध नसल्यामुळे रेती उत्खनन/वाहतूक करावयास अडचणी आल्यास शासना विरुध्द माझी कोणतीही तक्रार राहणार नाही व अशी स्थिती निर्माण झाल्यास रेती उपगटाचे भरलेली अनामत मी परत मागणार नाही. रेती उपगट ई-निविदा /ई-लिलावाबाबतच्या अटी व शर्ती मी स्वत: वाचल्या /वाचून घेतल्या असून त्या मला मान्य आहेत.

मी असे ही प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, ई-निविदा/ई-लिलावाच्या सर्वोच्च बोलीची रक्कम व त्या अनुषंगाने आवश्यक असणारे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे सर्वेक्षण शुल्क, विक्रीकर, टी.सी.एस. पर्यावरण शुल्क इत्यादी आवश्यक त्या सर्व शासकीय रक्कमा/कर लिलाव मंजूर झाल्यानंतर 15 दिवसाचे आत ताबा घेण्यापूर्वी भरणेस तयार आहे. सदर लिलावाचे अनुषंगाने रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित अटी/शर्ती सह करारनामा करुन देण्यात येईल. यामध्ये कसूर झाल्यास माझी ई-निविदा/ई-लिलावना मंजूर होईल व शासनाचे होणारे नुकसान मी भरुन देण्यास तयार आहे.

मला ई-निविदा/ई-लिलावाच्या अटी/शर्ती मान्य असून त्याचे मी तंतोतंत पालन करेन. उपरोक्त दिलेली माहिती ही सत्य असून खोटी ठरल्यास, नियमानुसार कारवाईस पात्र राहीन याची मला कल्पना आहे, हे प्रतिज्ञापत्र लिहून दिले.

(नांव )